ICMR | SHINE

ICMR S.H.I.N.E.

# राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थी स्पर्धा २०२६



## 1. स्पर्धेचा आढावा

- इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) तर्फे आयोजित S.H.I.N.E. (Science, Health and Innovation for NextGen Explorers) या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये इयत्ता ९ वी ते १२ वीमध्ये शिकणाऱ्या शासकीय व खासगी शाळांतील विद्यार्थ्यांना वास्तव जीवनातील सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करून उपाय सुचविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
- "विकसित भारत २०४७" या भारताच्या दूरदृष्टीशी सुसंगत असलेल्या या स्पर्धेचा उद्देश वैज्ञानिक साहित्याचा अभ्यास, सहाध्यायींसोबत चर्चा आणि निरीक्षण यांच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील समस्यांवर वैज्ञानिक जिज्ञासा निर्माण करणे व त्यावर उपाय शोधण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे हा आहे.

## 2. स्पर्धेचे स्वरूप

**विषय (Theme):** "विकसित भारत २०४७" साठी युवकांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा जागृत करणे."

**टीप:** संशोधन आणि कल्पना विकसित करण्याच्या प्रकियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (Artificial Intelligence - AI) चा वापर करण्यास प्रोत्साहन दिले जाते. मात्र अंतिम सादरीकरणामध्ये विद्यार्थ्यांनी स्वत:चे विचार, युक्तिवाद आणि निष्कर्ष स्पष्टपणे मांडणे अपेक्षित आहे.

## 3. पात्रता

**इयत्ता:** इयत्ता ९ वी ते १२ वीमध्ये शिकणारे शालेय विद्यार्थी.

**शाळा:** भारतातील सर्व शासकीय, निमशासकीय/शासकीय अनुदानित तसेच खासगी शाळांमधील विद्यार्थी.

**प्रवेश शुल्क:** या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क किंवा इतर शुल्क आकारले जाणार नाही.



## 4. सादरीकरणासाठी आवश्यक बाबी

- प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याने सार्वजनिक आरोग्याशी संबंधित **एक महत्त्वाची समस्या** ओळखून, उपलब्ध बैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे त्यावरील उपाय सुचवावेत.

- विद्यार्थ्यांनी वर्गातील चर्चा, मित्रांसोबत विचारविनिमय तसेच डिजिटल आणि मुद्रित साहित्याचा अभ्यास करून आपला संशोधन प्रश्न निश्चित करावा. या प्रक्रियेसाठी AI साधनांचाही वापर करता येईल. यामध्ये संशोधन प्रश्न विकसित करणे किंवा त्यात सुधारणा करणे तसेच संभाव्य उपायांचा शोध घेणे यांचा समावेश असू शकतो. मात्र विद्यार्थ्यांनी त्यांच्या सादरीकरणामध्ये AI चा वापर केल्यास त्याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

- विद्यार्थ्यांनी खालील विभागांचा समावेश असलेला दोन पानांचा दस्तऐवज (मजकूर) तयार करावा:

i. **स्वतःबद्दल (About Yourself):**
स्वतःचा १०० शब्दांमध्ये परिचय

ii. **पार्श्वभूमी (Background):**
निवडलेल्या समस्येचे सविस्तर वर्णन करा. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश असावा, त्या समस्येची स्थानिक किंवा संदर्भानुसार कारणे, मूळ कारणे (Root Causes), त्या समस्येशी संबंधित आरोग्यविषयक वर्तन, ही समस्या सोडविण्यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था (Non-Profit) किंवा नफा कमावणाऱ्या संस्था (For-Profit) यांनी भूतकाळात व सध्या केलेले प्रयत्न, तसेच ही समस्या अद्याप कायम राहण्यामागील कारणे.

iii. **समस्या ओळख (Problem Identification):**
आपण ही सार्वजनिक आरोग्यविषयक समस्या का निवडली, याचे कारण स्पष्ट करा. तसेच आपल्या संशोधन प्रश्नापर्यंत पोहोचण्यासाठी आपण कोणकोणत्या टप्प्यांतून गेलात, याचे थोडक्यात वर्णन करा.

iv. **समस्या विधान (Problem Statement):**
सार्वजनिक आरोग्याशी संबंधित समस्या स्पष्टपणे नमूद करणारे समस्या विधान लिहा. सध्याची परिस्थिती आणि अपेक्षित उद्दिष्ट यांतील अंतर (Gap) स्पष्ट करा.

v. **सुचविलेले उपाय (Suggested Solutions):**
ओळखलेल्या समस्येवर जास्तीत जास्त तीन उपाय सुचवा. समस्येचे निराकरण करण्यासाठी नाविन्यपूर्ण (Innovative) उपायांचाही विचार करा. तसेच, आपण स्वतः कोणती कृती कराल किंवा समाजात कोणते बदल घडून यावेत असे आपल्याला वाटते, हेही नमूद करू शकता.

vi. **सादरीकरण (Pitch):**
ही समस्या आणि त्यावरील उपाय आपण आपल्या मित्रांना, सहाध्यायांना, शिक्षकांना आणि पालकांना सोप्या भाषेत कसे समजावून सांगाल, ते लिहा. शक्यतो तांत्रिक शब्दांचा (Technical Terms) आणि क्लिष्ट भाषेचा वापर मर्यादित ठेवा.

## 5. महत्त्वाच्या तारखा

- **११ ऑगस्ट २०२६:** राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थी स्पर्धेचा अधिकृत शुभारंभ.
- **११ सप्टेंबर २०२६:** ICMR S.H.I.N.E. पोर्टलवर प्रवेशिका (Submissions) स्वीकारण्याची अंतिम तारीख.
- **१७ नोव्हेंबर २०२६:** निकाल जाहीर.



# 6. जनजागृती व प्रसार

देशभरातील विद्यार्थ्यांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी स्पर्धेचा राष्ट्रीय शुभारंभ खालील तीन प्रमुख माध्यमांतून एकाच वेळी करण्यात येईल:

1. मुद्रित माध्यमे (Print Media) आणि सामाजिक माध्यमे (Social Media)
2. ICMR ची अधिकृत संकेतस्थळ (Website) आणि ICMR S.H.I.N.E. पोर्टल
3. ICMR संस्थांमार्फत त्यांच्या शाळांशी असलेल्या नेटवर्कद्वारे पाठविण्यात येणारी निमंत्रणे

# 7. सादरीकरणासाठी मार्गदर्शक सूचना

- **सादरीकरणाचे स्वरूप (Submission Format):**
  सहभागींनी दोन पानांचा PDF दस्तऐवज (मजकूर) सादर करणे आश्‍यक आहे. या दस्तऐवजात चित्रे (Illustrations), आकृत्या (Graphics), आलेख (Graphs) किंवा प्रवाहचित्रे (Flow Charts) समाविष्ट करू शकतात.

- **सादरीकरणाच्या भाषा (Languages for Submission):**
  प्रवेशिका इंग्रजी किंवा भारताच्या २२ अनुसूचित भाषांपैकी कोणत्याही एका भाषेत सादर करता येईल: (1) आसामी, (2) बंगाली, (3) गुजराती, (4 )हिंदी, (5) कन्नड, (6) काश्मीरी, (7) कोंकणी, (8) मल्याळम, (9) मणिपुरी, (10) मराठी, (11) नेपाळी, (12) ओडिया, (13) पंजाबी, (14) संस्कृत, (15) सिंधी, (16) तमिळ, (17) तेलुगू, (18) उर्दू (19) बोडो (20) संथाली, (21) मैथिली (22) डोगरी.

- **ऑनलाईन सादरीकरण (Online Submission):**
  प्रत्येक शाळेने नियुक्त केलेली नोडल व्यक्ती (Nodal Person) विद्यार्थ्यांच्या प्रवेशिका दिलेल्या दस्तऐवजाच्या नमुन्यानुसार (Template) अपलोड करेल. प्रवेशिका फक्त ICMR S.H.I.N.E. वेब पोर्टलवरच अपलोड कराव्यात.

## 8. मूल्यांकन निकष

SHINE
SCIENCE & HEALTH INNOVATION
FOR THE NEXTGEN EXPLORERS

| मूल्यांकन निकष | वर्णन |
| --- | --- |
| वैज्ञानिक विचारसरणी (Scientific Thinking) | आपण समस्येचे काळजीपूर्वक निरीक्षण करून त्यावर तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक पद्धतीने विचार केला आहे का? |
| समस्या ओळख (Problem Identification) | आपण ही समस्या का निवडली? तसेच, या समस्येचे निराकरण आपल्या समाजाच्या आरोग्य सुधारण्यासाठी कशाप्रकारे उपयुक्त ठरेल? |
| समस्या-उपाय सुसंगती (Problem-Solution Narrative) | आपल्या सादरीकरणामध्ये मांडलेली समस्या आणि सुचविलेले उपाय यांच्यात स्पष्ट व तर्कसंगत संबंध आहे का? |
| सादरीकरणाची सुलभता (Simplicity of Pitch) | आपल्या कल्पना केवळ तज्ज्ञांनाच नव्हे, तर सर्वसामान्य व्यक्तीलाही सहज समजू शकतील का? |



## 9. प्रयत्नांची दखल

- **सहभाग प्रमाणपत्र (Certificate of Participation):** स्पर्धेसाठी यशस्वीपणे प्रवेशिका सादर करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला ICMR तर्फे सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

- **विजेत्यांचा गौरव (Recognition of Winners):** स्पर्धेतील अव्वल १०० विजेत्यांना प्रत्येकी ₹१,०००/- चे रोख पारितोषिक तसेच ICMR कडून प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.